या समवेत:- सोमवार दिनांक-०३/ ११/२०२५ रोजी दुपारी १.०० वा. प्राप्त झालेल्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या,स्थायी समिती सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/स्थायी सभा/ ६४० /२०२५
अहिल्यानगर, दिनांक १७/ ११ /२०२५

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहिल्यानगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, अहिल्यानगर
४. खाते प्रमुख सर्व

२/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील स्थायी समिती सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके)
सचिव,स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ०३/११/२०२५ रोजी दुपारी १.०० वा. सभेचे कार्यवृत्त

हजर अधिकारी

अ.क्र.	नाव	अ.क्र	नाव
१	मा.श्री.आनंद भंडारी, प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	२	मा.विजय मुळीक अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
३	श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)	४	श्री.शैलेश मोरे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
५	श्री दादाभाऊ गुंजाळ उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.)	६	श्री.राजेंद्र देसले प्रकल्प संचालक जलजीवन मिशन
७	श्री संजय कदम प्रभारी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक)	८	श्री सागर चौधरी कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण)
९	श्री.बाळासाहेब ननवरे कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर)	१०	श्री.सुभाष सातपुते प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)
११	श्री.डपकर शिवम प्रभारी जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा)	१२	श्री एच.बी.चव्हाण कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.)
१३	श्री सुधीर शिंदे कृषि विकास अधिकारी	१४	डॉ.श्री दशरथ दिघे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अहिल्यानगर
१५	डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे जिल्हा आरोग्य अधिकारी	१६	श्री.भास्कर पाटील शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
१७	श्रीम संध्या गायकवाड शिक्षणाधिकारी (माध्यमिक)	१८	श्री देविदास कोकाटे जिल्हा समाज कल्याण अधिकारी
१९	श्री बाबासाहेब घोरपडे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी	२०	श्री. निखिल पठारे प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.)
२१	श्री बाळासाहेब बुगे शिक्षणाधिकारी (योजना)		

विषय क्रमांक १:- दि. ०३/१०/२०२५ रोजीची स्थायी सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे .

ठराव क्र १७९- दि ०३/१०/२०२५ रोजी दुपारी १.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे व संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

विषय क्रमांक २- जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ मध्ये लेखाशिर्ष २२१०- । ७१९ नियतव्यय मंजूर झाल्याप्रमाणे रु.५०.०० लक्ष, मंजुर अनुदानातुन प्राथमिक आरोग्य केंद्राचे /उपकेंद्राचे /आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बळकटीकरण करणे या योजनेअंतर्गत आवश्यक साहित्य साधन सामुग्री, उपकरणे ,लिनन साहित्य ई. खरेदी खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत

प्रस्तावना-

अहिल्यानगर जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये एकूण १०४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ५९८ उपकेंद्रे २ आयुर्वेदिक दवाखाने,व पाच प्राथमिक आरोग्य पथके कार्यान्वीत आहेत. सदर आरोग्य संस्थामार्फत ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा देण्याचे काम चालु आहे.

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राचे /उपकेंद्राचे /आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बळकटीकरण करणे या योजनेअंतर्गत २२१०- । ७१९ लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु.५० लक्ष इतका नियतव्यय मा.जिल्हा नियोजन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,अहिल्यानगर या कार्यालयाकडील नियतव्यय मंजूर पत्र जा.क्र./जिवायो/२५-२६/अर्थसंकल्प तरतूद/संस /४/८०९/२०२४ COLAHM28012/24/2025 –Planning/I/1194916 दिनांक-३०/०४/२०२५ नुसार खालील प्रमाणे नियतव्यय मंजुर केलेला आहे.

तक्ता अ

अ.क्रं	बाब	शासकीय लेखाशिर्ष	मंजूर नियतव्यय सन २०२५-२६
१	प्राथमिक आरोग्य केंद्राचे /उपकेंद्राचे /आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बळकटीकरण	२२१०-।७१९	रु .५०.०० लक्ष

सदर पत्रानुसार प्रशासकीय मान्यता घेण्यात येऊन निधी मागणी करण्याबाबत सूचना प्राप्त असल्याने झालेल्या आहेत.

उपरोक्त अनुदानातून प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र आयुर्वेदिक व युनानी दवाखाने ई .आरोग्य संस्थांच्या ठिकाणी आवश्यक साहित्य साधन सामुग्री, यंत्रसामुग्री उपकरणे,लिनन साहित्य ई .बाबी खरेदीची गरज भांडार विभागातील शिल्लक साठा मा.संचालक स्तरावरून होणारा पुरवठा व भौगोलिक परिस्थिती ई.बाबींचा विचार करून अनुदान प्राप्त झालेनंतर ,मा.उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक मंडळ,नाशिक यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसारच

व वेळोवेळी निर्गमित केलेल्या खरेदी धोरणानुसार ,साहित्य साधन सामुग्री, उपकरणे ,लिनन साहित्य ,ई .खरेदीची कार्यवाही करण्यात येऊन मागणीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्रांना /उपकेंद्रांना आणि आयुर्वेदिक व युनानी दवाखान्यांना ,साहित्य साधन सामुग्री, उपकरणे ,लिनन साहित्य हॉस्पिटल युक्त आवश्यक फर्निचर,ई . बाबींचा पुरवठा मागणीनुसार करण्यात येईल .

सदर योजनेस प्रशासकीय मान्यता घेणेसाठी महाराष्ट्र शासन ,ग्रामविकास विभाग ,शा.नि.क्र . झेपिए - २०१६/प्र .क्र . ५६/वित्त-९ मुंबई ३२ दिनांक -०७/१०/२०१७ अन्वये मा .जिल्हा परिषद स्थायी समिती सभा सभा सक्षम आहे .

तथापि,महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग राजपत्र असाधारण क्र . २६ दिनांक ११ मार्च २०२२ अन्वये कार्यकाल दिनांक २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आला आहे .त्यामध्ये जिल्हा परिषद अ.नगर चा समावेश आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग ,मुंबई १ जा.क्र. सा.प्र.वि १/परिषद /३३४/२०२२ अ.नगर दिनांक २८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंबलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केली आहे .तरी सदरच्या विषयास प्रशासकीय मान्यतेस्तव मा. जिल्हा परिषद स्थायी सल्लागार समिती सभेसमोर सविनय सादर

मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय-

सामान्य प्रशासन विभाग, मुंबई १ जा.क्रं.साप्रवि१/परिषद/३३४/२०२२ अहमदनगर दि.२८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंमलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केली असल्याने सदर अनुदानास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा. जिल्हा परिषद स्थायी सल्लागार समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता मिळणेस सविनय सादर

ठराव क्र १८०- उपरोक्त नमूद तक्ता अ मधील जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राचे /उपकेंद्राचे /आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बळकटीकरण करणे योजनेअंतर्गत २२१०-। ७१९ लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु.५० लक्ष रक्कमेतून आवश्यक साहित्य साधन सामुग्री, उपकरणे ,लिनन साहित्य ,ई .खरेदीची कार्यवाही करण्यात येऊन मागणीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्रांना /उपकेंद्रांना आणि आयुर्वेदिक व युनानी दवाखान्यांना ,साहित्य साधन सामुग्री, उपकरणे ,लिनन साहित्य हॉस्पिटल युक्त आवश्यक फर्निचर,ई . बाबींचा पुरवठा मागणीनुसार करण्यात येईल .

सदर योजनेस प्रशासकीय मान्यता घेणेसाठी महाराष्ट्र शासन ,ग्रामविकास विभाग ,शा.नि.क्र . झेपिए - २०१६/प्र .क्र . ५६/वित्त-९ मुंबई ३२ दिनांक -०७/१०/२०१७ अन्वये मा .जिल्हा परिषद स्थायी समिती सभा सक्षम आहे . तथापि ,महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग राजपत्र असाधारण क्र . २६ दिनांक ११ मार्च २०२२ अन्वये कार्यकाल दिनांक २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आला आहे.त्यामध्ये जिल्हा परिषद अहमदनगरचा समावेश आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग ,मुंबई १ जा.क्र. सा.प्र.वि १/परिषद /३३४/२०२२ अहमदनगर दिनांक- २८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद जिल्हा परिषद स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंबलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केली असल्याने सदरच्या विषयास मा.जिल्हा परिषद स्थायी समिती सभेच्या वतीने सर्वानुमते प्रशासकीय मान्यता मंजुरी देण्यात येत आहे आणि अनुदान वर्ग करण्यासाठी हरकत नसल्याने संबंधित पत्रान्वये निधी मागण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे .

विषय क्रमांक ३–आजारी कंपनी जे.एम.ॲल्युमिनिअम एल.एल.पी.या कंपनीसाठी ग्रामपंचायत नवनागापूर मार्फत आकारणी करण्यात आलेला थकीत कर माफ करणेबाबत, दाखल अपिलावरील गटविकास अधिकारी ,पंचायत समिती अहिल्यानगर यांचे दिनांक १८/०८/२०२५ चे आदेशाविरुद्ध अपीलाबाबत.

ग्रामपंचायत नवनागापूर, MIDC हद्दीतील प्लॉट नं. डी ९३ IAEC प्रा.लि. ही कंपनी मागील काही वर्षापासून कार्यरत नसल्यामुळे कॅनरा बँक,ए.आर एम.बँच मुंबई -२ यांनी दिनांक १३/०८/२००४ रोजी ही कंपनी आजारी स्थितीमध्ये गेल्याचे डी.आर.टी मुंबई मार्फत अधिकृत नोटीस द्वारे जाहीर केले होते. त्यानंतर ही कंपनी जे एम.ॲल्युमिनिअम एल.एल.पी या कंपनीसाठी दिनांक ०६/०१/२०२२ रोजी बँकेकडून विकत घेतली परंतु तिचे हस्तांतरण डी-९३ IAEC या कंपनीकडून २५/०८/२०२३ रोजी मिळाले आहे. हस्तांतरण मिळाले पासून जे एम.ॲल्युमिनिअम एल.एल.पी कंपनी (श्री.निखिलेंद्र मोतीलाल लोढा) हे कर भरण्यास तयार आहेत तसे त्यांनी अर्जात नमूद केले आहे परंतु त्या आधीचा कर ग्रामपंचायत नवनागापूर यांनी माफ करावा असे त्यांचे म्हणणे आहे.सदरचा कर २०२३/२४या वर्षाअखेर र.रु.**२४३९९२६/-** आहे.

तथापि या संदर्भात गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांच्याकडे दिनांक १५/०७/२०२५ रोजी सुनावणी घेवून दिनांक **१८/०८/२०२५** रोजी वरील संदर्भात आदेश दिलेला आहे. सदरचा आदेश संबंधीत अपिलार्थी यांना अमान्य असल्याने त्यांनी ग्रा.पं.अधिनियम १९५९ चे कलम १२४ (५) प्रमाणे स्थायी समितीकडे अपील केले आहे.

अ)ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १२४(५) नुसार पंचायत समिती ज्या तारखेस निर्णय करेल त्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत स्थायी समितीकडे अपील करता येईल. (त्यानुसार अपील मुदतीत प्राप्त आहे.)

ब) महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम, १९६० च्या नियम १९ नुसार एखादी इमारत एखाद्या वर्षी सतत तीन महिने किंवा त्याहून अधिक मुदतीपर्यंत रिकामी व अनुत्पादक राहिल्यास अशा इमारतीवर या भागात जोडलेल्या अनुसूचीत इमारतीच्या कराच्या दरासाठी विनिर्दिष्ट केलेल्या किमान दराने कर आकारणी करण्यात येईल आणि पंचायतीने चालू दरानुसार आकारलेली कराची रक्कम व या भागात जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या किमान दराने आकारलेल्या कराची रक्कम यांतील फरकाच्या रकमेची सूट देईल. परंतु , ती इमारत रिकामी अथवा अनुत्पादक असल्याबद्दलची वस्तुस्थिती सरपंचाला लेखी नोटीस देऊन कळविल्याशिवाय अशी सूट दिली जाणार नाही किंवा पैसे परत केले जाणार नाहीत. व ज्या तारखेस सरपंचास अशी नोटीस देण्यात आली असेल त्या तारखेच्या पूर्वीच्या कोणत्याही कालावधीसाठी अशी सूट देण्यात येणार नाही किंवा पैसे परत केले जाणार नाहीत.महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम, १९६० च्या नियम १९ नुसार वरील प्रमाणे तरतूद असलेने व आजारी कारखान्यांच्या करवसुली संदर्भात इतर विशेषबाब म्हणून कोणतीही तरतूद नसल्याने कारखान्यावर असलेला थकीत कर माफ करता येणार नाही.पंचायत समिती अहिल्यानगर यांना सदरची मालमत्ता ग्रामपंचायत निंबळक किंवा नवनागापूर हद्दीत आहे याबाबतची खातरजमा करुन अहवाल मागविण्यात यावा व अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील सुनावणी घेण्यात यावी.

सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर